रासबिहारी शाळेचे विश्वस्त श्रीरंग सारडा, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका शिल्पा

सिद्धा लोढा हिने सूत्रसंचालन केले. ऋतुजा शार्दूलने रासबिहारी शाळेची आणि क्रिकेट करंडकाची माहिती दिली.

सोसायटी, संत जनार्दन स्वामीनगर, नवीन आडगाव नाका, पंचवटी या पत्त्यावर पाठवावे, असे आवाहन सरचिटणीस बापू बैरागी यांनी केले.



नाशिक : क. का. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयात कॅम्पस इंटरव्ह्यूमध्ये निवड झालेल्या विद्यार्थ्यांसमवेत बुधव
संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब वाघ, प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर, पी. के. शहाबादकर आदी.

## अभियांत्रिकीच्या ६३ विद्यार्थ्यांना नोकरी


॥ प्रथम वर्षश्राद्ध



## वाघ कॉलेजच्या विद्यार्थ्यांची साडेसात लाखांचे मिळाले पॅकेज

**नाशिक :** इंजिनीअरिंगच्या विद्यार्थ्यांना नोकरीच्या उत्तम संधी प्राप्त व्हाव्यात, यासाठी के. के. वाघ कॉलेज ऑफ इंजिनीअरिंगमध्ये कॅम्पस इंटरव्ह्युचे आयोजन करण्यात आले होते. एन-व्हिडिया या कंपनीद्वारे ही प्रक्रिया पार पाडण्यात आली. यामध्ये कॉम्प्युटर विद्याशाखेच्या दोन विद्यार्थ्यांची निवड करीत कंपनीने त्यांना तब्बल साडे सात लाख रुपये पॅकेजची ऑफर देऊ केली आहे. या निवड प्रक्रियेत ९५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या सर्व विद्यार्थ्यांना एन-व्हिडिया कंपनीच्या अधिकाऱ्यांनी कंपनीची, निवड प्रक्रियेची माहिती दिली. त्यानंतर टेक्निकल इंटरव्ह्यु घेऊन १५ विद्यार्थ्यांची वैयक्तिक इंटरव्ह्युसाठी निवड करण्यात आली. त्यापैकी ४ विद्यार्थ्यांची एचआर इंटरव्ह्युसाठी निवड होऊन संध्या परवाणी आणि प्रशांत धेंडे या विद्यार्थ्यांना साडेसात लाख पॅकेजची ऑफर देत निवडण्यात आले. या विद्यार्थ्यांची इंजिनीअरिंगची अंतिम परीक्षा पार पडली की, जुलै २०१६ मध्ये एन-व्हीडिया कंपनीमध्ये त्यांना रुजू होता येणार आहेत. या इंटरव्ह्यु प्रक्रियेसाठी विद्यार्थ्यांना वाघ कॉलेजचे प्राचार्य डॉ. केशव नांदूरकर, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट सेलचे प्रमुख प्रा. प्रमोद शहाबादकर आदींचे मार्गदर्शन लाभले.

# वाघ इंजिनीअरिंगमध्ये आज कॅम्पस इंटरव्ह्यू

**म. टा. प्रतिनिधी,** नाशिक

एचसीएल कार्पोरेशन कंपनीद्वारे शुक्रवारी (दि. २०) के. के. वाघ इंजिनीअरिंग कॉलेजमध्ये पूल कॅम्पस इंटरव्ह्यू प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. सकाळी ८.३० वाजता ही प्रक्रिया सुरु होणार असून, अधिकाधिक विद्यार्थ्यांना नोकरीच्या संधी मिळाव्यात, या उद्देशाने याचे आयोजन करण्यात आले आहे.

२०१३-१४ व २०१४-१५ या शैक्षणिक वर्षांमध्ये उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना या प्रक्रियेत सहभाग घेता येणार आहे. प्रामुख्याने कॉम्प्युटर, आयडटी, इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन या ब्रँचेसमधील पदवी असलेले विद्यार्थी प्रक्रियेत सहभागी होऊ शकणार आहेत.

एचसीएल कंपनी 'यंग इंजिनीअर प्रोग्राम' या उपक्रमांतर्गत ही प्रक्रिया वाघ कॉलेजमध्ये राबविणार आहे. यांत निवड झालेल्या विद्यार्थ्यांना पुणे व नागपूर येथे प्रशिक्षण घेण्याची संधी मिळणार आहे. याद्वारे त्यांना स्किल डेव्हलपमेंट, ६ महिने पूर्ण वेळ, रेसिडेन्शियल करिअर डेव्हलपमेंट प्रोग्राम व त्यासोबत विद्यावेतनही मिळणार असल्याची माहिती कंपनीच्या अधिकाऱ्यांनी कॉलेजला कळवली आहे. ६ महिन्यांचे प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर ३.६ लाखाच्या वार्षिक पॅकेजसह विद्यार्थ्यांना रुजू करुन घेतले जाणार आहे. कॉलेजच्या भारतरत्न डॉ. एपीजे अब्दुल कलाम करिअर डेव्हलपमेंट सेंटर येथे इंटरव्ह्यू प्रक्रिया पार पडणार आहे.

## इंटरव्ह्यूत सहभागी होण्यासाठी पात्रता

इंजिनीअरिंगची किंवा कॉम्प्युटर सायन्स, आयटी, इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन या स्पेशल विषय घेऊन बी.टेकची पदवी मिळवलेले विद्यार्थी इंटरव्ह्यू प्रक्रियेत सहभागी होऊ शकणार आहे. तसेच एमटेक व एमसीए झालेले विद्यार्थ्यांसाठी देखील ही प्रक्रिया खुली ठेवण्यात आली आहे. इच्छूकांना दहावी व बारावीत ६० टक्के तर पदवीमध्ये ५८ टक्के असणे आवश्यक आहे.

नाशिक : क. का. वाघ अभियांत्रिकी महावि
संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब वाघ, प्राचार्य ड

# अभियांत्रिकीच्या ६३ विद्यार्थ्यांना नोकरी



नाशिक, ता. २७ : येथील क. का. वाघ इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग एज्युकेशनल ॲण्ड रिसर्च सेंटर येथे झालेल्या कॅम्पस इंटरव्ह्यूमध्ये ६३ विद्यार्थ्यांना नोकरी मिळाली आहे. केपीआयटी टेक्नॉलॉजी (पुणे) आणि एल ॲण्ड टी इन्फोटेक या कंपन्यांतर्फे विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली.

केपीआयटी टेक्नॉलॉजी आणि एल ॲण्ड टी इन्फोटेक या कंपन्यांच्या अधिकाऱ्यांनी क. का. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाला भेट दिली. या वेळी झालेल्या कॅम्पस